RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ८, अंक ३०] गुरूवार, नोव्हेंबर २४, २०२२/अग्रहायण ३, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ६१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२.—** मुंबई महानगरपालिका अधिनियमात, आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. ... ... ... ... | १—३ |

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ नोव्हेंबर २०२२.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XII OF 2022.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.

**सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२.**

**मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१८८८ चा ३. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

**त्याअर्थी,** आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२२, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १५४ ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) कलम १५४ मध्ये, पोट-कलम (१ड) मधील, खंड (अ) मध्ये,— १८८८ चा ३.

(एक) उप-खंड (एक) मधील, " व २०२१-२०२२ या वर्षी " या मजकुराऐवजी, ", २०२१-२०२२ या वर्षी व २०२२-२०२३ या वर्षी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) उप-खंड (दोन) मधील, " व २०२१-२०२२ या वर्षी " या मजकुराऐवजी, ", २०२१-२०२२ या वर्षी व २०२२-२०२३ या वर्षी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) उप-खंड (तीन) मधील,—

(अ) " २०२२-२०२३ या वर्षी " या मजकुराऐवजी, " २०२३-२०२४ या वर्षी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) " व २०२१-२०२२ या वर्षी " या मजकुराऐवजी, ", २०२१-२०२२ या वर्षी व २०२२-२०२३ या वर्षी " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**३.** (१) या अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या, मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, परंतु या अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे निदेश, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे देता येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्यात येईल.

## निवेदन

मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा ३) याच्या कलम १३९ च्या खंड (१) मध्ये मालमत्ता कर लादण्यासंबंधी तरतूद आहे. उक्त अधिनियमाच्या कलम १५४ मध्ये, मालमत्ता कर आकारणीयोग्य असलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे पट्टीयोग्य मूल्य किंवा भांडवली मूल्य निर्धारित करण्याची तरतूद आहे. उक्त कलम १५४ च्या पोट-कलम (१अ) मध्ये, त्याखाली नमूद केलेले घटक लक्षात घेऊन, आयुक्ताकडून मालमता कर आकारणीयोग्य असलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे भांडवली मूल्य निश्चित करण्याची तरतूद आहे. त्याच्या पोट-कलम (१क) मध्ये अशी तरतूद आहे की, उक्त कलम १५४ च्या पोट-कलम (१अ) अन्वये निश्चित केलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे भांडवली मूल्य, दर पाच वर्षांनी सुधारित करण्यात येईल आणि २०२०-२१ या वर्षामध्ये अशी सुधारणा करण्याचे नियत होते.

२. तथापि, कोविड-१९ या सार्वत्रिक साथरोगाचा फैलाव झाल्यामुळे, राज्य शासनाकडून तसेच केंद्र सरकारकडून टाळेबंदी घोषित करण्यात आली होती, त्यामुळे लघुउद्योग, शैक्षणिक संस्था, विकास कामे, कारखान्यातील कामकाज, विविध औद्योगिक क्षेत्रे, दैनंदिन कार्ये, इत्यादींवर प्रतिकूल आर्थिक परिणाम झालेला आहे. म्हणून, सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ द्वारे उक्त अधिनियमाच्या कलम १५४ मध्ये नवीन पोट-कलम (१ड) जादा दाखल केले होते; जेणेकरून, उक्त कलम १५४ च्या पोट-कलम (१अ) अन्वये निश्चित केलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे भांडवली मूल्य, २०२०-२१ या वर्षामध्ये सुधारित करण्यात येणार नाही आणि कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे मालमत्ता कर देयक, २०१९-२०२० यावर्षी जे होते तेच असेल; आणि उक्त पोट-कलम (१ड) मध्ये अन्य परिणामस्वरूप तरतुदी देखील केल्या होत्या. त्यानंतर, सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ द्वारे उक्त कलमात सुधारणा केली होती, जेणेकरून उक्त पोट-कलम (१अ) अन्वये निश्चित केलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे भांडवली मूल्य, २०२१-२२ या वर्षामध्ये देखील सुधारित केले जाणार नाही आणि कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे मालमत्ता कर देयक, २०१९-२० यावर्षी जे होते तेच असेल.

एकूणच अर्थव्यवस्थेवरील कोविड-१९ या सार्वत्रिक साथरोगाचा प्रतिकूल परिणाम अजूनही आहे, म्हणून, पोट-कलम (१अ) अन्वये निश्चित केलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे भांडवली मूल्य, २०२२-२३ या वर्षामध्ये देखील सुधारित करण्यात येणार नाही अशी तरतूद करण्याच्या दृष्टीने, उक्त कलम १५४ च्या पोट-कलम (१ड) मध्ये यथोचित सुधारणा करणे इष्ट वाटते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २३ नोव्हेंबर २०२२.

**भगत सिंह कोश्यारी,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सोनिया सेठी,**
शासनाच्या प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.